# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### नांदेड जिल्ह्यातील बाभळी बंधाऱ्यातील पाण्यावर व बंधाऱ्याच्या बॅकवॉटर वर उपसा जलसिंचन योजना राबविण्याबाबत

**(१) ३६२६ (२३-१२-२०१४). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील बाभळी बंधाऱ्यातील पाण्यावर व बंधाऱ्याच्या बॅकवॉटर वर कुंडलवाडी-शेळगाव-चन्नापूर व पाटोदा-माष्टी ता.बिलोली या दोन उपसा जलसिंचन योजना कार्यन्वित करुन त्याद्वारे कुंडलवाडी परिसरातील पाच माल गुजारी तलावामध्ये साठवण करण्याबाबतचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ रोजी शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने काय निर्णय घेतलेला आहे वा घेणार आहे,

(३) अद्यापी निर्णय झाला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०५-२०१५) :**(१) नाही.

उक्त प्रकरणी जिल्हा अधिकारी, नांदेड यांनी जलसंपदा विभागाचे क्षेत्रिय कार्यालयाकडे दि.१५/०५/२०१२ रोजी संदर्भ केला होता. त्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी दि. १५/०९/२०१२ चे पत्रान्वये उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, नांदेड यांना अहवाल सादर केला आहे. त्यानुसार विषयांकित उपसा सिंचन योजना तसेच माल गुजारी तलाव जलसंपदा विभागाचे मालकीचे नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमनुरी तालुक्यात इसापूर धरण कालव्याच्या शिवारातील झाडे-झुडपे काढण्याबाबत**

**(२) ५६३२ (०८-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी तालुक्यात इसापूर धरण कालव्याच्या विविध शिवारात झाडे झुडपे वाढली आहेत तसेच काही भागातून पाणीही झिरपत आहे, यामुळे पाणी सोडल्यावर सर्व भागात पुर्ण क्षमतेने कालव्याचे पाणी पोहचत नसल्यास दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याच्या शिवारातील झाडे झुडपे काढण्याबाबत तसेच पाणी गळती थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) कालव्यावरील झाडे, झुडपे काढण्याबाबत सध्या विभागाच्या उपलब्ध मजुरामार्फत व यांत्रिकी विभागाच्या मशिनरी मार्फत कारवाई करण्यात येत आहे. कालव्यावरील बांधकामामधून होणारा पाणी झिरपा थांबविण्यासाठी क्षतिग्रस्त बांधकामाच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदूर रेल्वे तालुक्यातील (जि.अमरावती) पूर्णा प्रकल्पाचे ढिसाळ नियोजनामुळे कालव्यातील पाणी वाहून जात असल्याबाबत**

**(३) ५६८९ (०७-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर रेल्वे तालुक्यातील (जि.अमरावती) पूर्णा प्रकल्पाचे ढिसाळ नियोजनामुळे कालव्यातील हजारो लिटर पाणी वाहत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्णा प्रकल्पाच्या नियोजनशुन्य कारभाराची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कार्यवाही केली तसेच सदर प्रकल्पाच्या पाण्याची पातळी वाढविण्यासाठी व सदर प्रकल्पातील पाणी वाया जाऊ नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०५-२०१५) :**(१) नाही.
(२) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही.
(३) सदर प्रकल्पाचे मुख्य कालवा व वितरण प्रणालीची कामे पुर्ण झाली असून पाणी वापराची कार्यक्षमता वाढविणेसाठी विमोचकाखालील पाटचाऱ्यांची कामे पी.व्ही.सी. पाईप लाईन अंतर्गत केलेली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुरमेपाडा लघुप्रकल्पाचे (जि. धुळे) लाभक्षेत्राचे विस्तारीकरण करण्याबाबत**

**(४) ५८३२ (०६-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयातील पुरमेपाडा लघुप्रकल्पाचा लाभ पुरमेपाडा,अनकवाडी, आर्वी,मोघण, हेंद्रुण, धारडा, धाडरी, बोरकुंड,शिरुड, बोळे, बाबरे आदी गावांना हव्या त्या प्रमाणात होत नसून मालेगांव तालुक्यातून वाहणा-या मौसम नदीचे वाहून जाणारे पाणी पुरमेपाडा प्रकल्पात टाकल्यास आर्वी परिमंडळातील शेतजमिन १०० टक्के ओलीताखाली येईल असे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्षेत्र ओलीताखाली आणण्यासाठी शासनाने काही निर्णय घेण्याचे ठरविले आहे काय,
(३) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.
तथापि सदर प्रकरणी पाण्याच्या उपलब्धते संदर्भाने क्षेत्रिय स्तरावर अभ्यास सुरु आहे.
(२) सदर प्रकरणी अभ्यास अंतिम झाल्यावर शासनाच्या प्रचलित नियमांनुसार कार्यवाही करण्यात येईल.
(३) व (४) उक्त प्रकरणी वर नमूद केल्यानुसार कार्यवाही सुरु असून विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कार्यकारी अभियंता प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, नंदुरबार या पदावरील अधिकाऱ्यांकडे जळगांव येथील पदाचाही अतिरिक्त कार्यभार सोपविल्याबाबत**

**(५) ५८८४ (१०-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, नंदुरबार या पदावरील अधिकाऱ्यांकडे जळगांव येथील सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार असून देखील त्यांना पुन्हा धुळे जिल्हयाचा कार्यभार सोपविण्यात आला असून त्यांच्याबाबतीत अनेक तक्रारी असल्याने त्याबाबतीत धुळे जिल्हा कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन व कार्यालयीन कर्मचारी यांनी संबंधित मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०७-२०१५)** :(१) श्री.एस.एस. सांगळे यांच्याबाबत तक्रारीचे निवेदन जिल्हा कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन व कार्यालयीन कर्मचारी यांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये मा.मंत्री (ग्राम विकास) यांना दिले आहे.
(२) व (३) श्री.एस.एस. सांगळे, कार्यकारी अभियंता, जि.नंदुरबार यांचेकडील कार्यकारी अभियंता, जळगाव पदाचा कार्यभार काढून घेण्यात आला आहे.

---

### विदर्भ सिंचन महामंडळाकडे निधी विनावापर पडून असल्याबाबत

**(६) ६०२६ (०८-०४-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दुष्काळ आणि शेतक-यांच्या आत्महत्यांचे सकंट कायम असतांना विदर्भ सिंचन महामंडळाकडे सुमारे २ हजार कोटी रुपयाचा निधी पडून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) हा निधी खर्च करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१५)** :(१) होय.
(२) व (३) भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन, स्थानिक शेतक-यांचा विरोध यासह प्रकल्पावरील अडचणी दूर करुन प्रकल्प कामांना गती देण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे.

---

### राज्यातील समुद्र किनारपट्टीवरील भूमीचे संरक्षणाबाबत

**(७) ६२१७ (०८-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील समुद्र किनारपट्टीवरील भूमीचे संरक्षण व्हावे यासाठी शासनाकडून खारभूमी विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील मंजुरी देण्यात आलेल्या १७० प्रकल्पांपैकी ६७ प्रकल्प प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधीची उपलब्धता नसल्यामुळे हे ६७ प्रकल्प प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(५) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व यासाठी किती निधी देण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०५-२०१५) :**(१) होय.
(२) अंशतः खरे आहे.
सन १९८१-८२ मध्ये तयार करण्यात आलेल्या खारभूमी विकास मंडळाच्या बृहत आराखड्यानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील १७० खारभूमी विकास योजना हाती घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
१७० खारभूमी योजनांपैकी ७९ खारभूमी योजनांची कामे पूर्ण झालेली असून १५ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरीत ७६ योजना हाती घेणेत आल्या नाहीत.
(३) नाही.
उर्वरित ७६ योजनांपैकी ५६ योजनांच्या ठिकाणी कांदळवन असलेणे त्या ठिकाणी योजना राबवणे शक्य नाही व २० योजना प्रचलित मापदंडात बसत नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील कुकडी प्रकल्प अंतर्गत डिंभा उजव्या कालव्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(८) ६३०० (०७-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील कुकडी प्रकल्प अंतर्गत डिंभा उजव्या कालव्याच्या गळतीने रोज लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डिंभा उजव्या कालव्याच्या अपुर्ण कामामुळे आतापर्यंत शिरुर तालुक्यातील शेवटच्या टोका पर्यंत पाणी सोडता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिरुर तालुक्यातील हजारो हेक्टर क्षेत्र डिंभा उजव्या कालव्याच्या उर्वरित अल्पशा अपुर्ण कामामुळे सिंचनापासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कुकडी प्रकल्पाच्या अपुर्ण कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळून डिंभा उजव्या कालव्याचे अपुर्ण काम तातडीने सुरु होण्याबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

दि.१६.१२.२०१४ रोजी डिंभे उजव्या कालव्यातून आवर्तन सुरु नव्हते. परंतु आर्वतन सुरु असतांना गळती होते.

(२) होय.

(३) होय, अंशत: खरे आहे.

डिंभे उजव्या कालव्याच्या कि.मी. ६० ते ११६ भाग शिरुर तालुक्यात असून, शिरुर तालुक्यातील ६९०७ हेक्टर क्षेत्रापैकी जून, २०१४ अखेर ३८७५ हेक्टर सिंचन निर्मिती झाली आहे. कालव्याचे अस्तरीकरण व वितरण व्यवस्थेची कामे अपूर्ण असल्याने काही क्षेत्र सिंचनापासून वंचित आहे.

(४) कुकडी प्रकल्पाच्या अपूर्ण कामांसाठी तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव अद्यावत दरसूची नुसार सुधारित करण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

---

**गोदावरी नदीतील प्रदुषण दुर करण्याबाबत**

**(९) ६४७८ (०७-०४-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगेच्या धर्तीवर गोदावरी नदीतील प्रदुषण दुर करुन स्वच्छ करण्याचा कृती आराखडा तयार करण्याचा निर्णय मा.जलसंपदा मंत्री तथा नाशिक जिल्हयाचे मा.पालकमंत्री यांनी दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व तो किती कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,

(३) अद्याप निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याचे कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण व मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पांना निधी देण्याबाबत**

**(१०) ६५०२ (०८-०४-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण व मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पांना एआयबीपी अंतर्गत भरीव अर्थसहाय्य केंद्र शासनाच्या जलसंपदा विभागाकडून राज्य शासनाला उपलब्ध करूण देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण व मराठवाड्यतील कोणत्या सिंचन प्रकल्पांच्या पुर्ततेसाठी निधीचे वाटप शासन करणार आहे व या निधीतून किती कालावधीत सदर सिंचन प्रकल्प पुर्ण करण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध व्हावा यासाठी राज्य शासनाकडून आतापर्यंत काय प्रयत्न करण्यात आले वा येत आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१५) :**(१) केंद्र शासनाने १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी स्विकृत केल्या असून त्यानुसार केंद्र शासनाकडून राज्याला प्राप्त होणा-या सहाय्यामध्ये बदल केले आहेत. त्यासंदर्भात वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमासाठी नवीन केंद्र व राज्य प्रमाणाबाबतचा तपशील अद्यापी प्राप्त झालेला नाही.
(२) विदर्भातील निम्न वर्धा, बेबळा, गासीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प निम्न पेढी, बावनथडी, पश्चिम महाराष्ट्रातील तारळी, धोमबदलकवडी, कृष्णा कोयना उ.सिं.यो., सांगाला शाखा कालवा, कोण्कणातील तिल्लारी, गडनदी, नरडवे अर्जुना, अरुणा मराठवाड्यातील अप्पर पैनगंगा, निम्न दुधरना हे प्रकल्प वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमाअंतर्गत आहेत. राज्याची अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपालांचे निदेश या मर्यादेत प्राप्त होणारे केंद्रिय सहाय्य व राज्य शासनातर्फे निधी उपलबध करुन तसेच या प्रकल्पांवरील अडचणी दूर करुन हे प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) सन २०१४-१५ मध्ये वेगवर्धीत सिंचन लाभ मिळणेबाबत १७ प्रकल्पांचे रु.१४६६.६९ कोटी किंमतीचे अर्थसहाय्य मिळणेबाबतचे प्रस्ताव केंद्र शासनास सादर केले होते. निधी वितरणाबाबत मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (जलसंपदा) यांनी केंद्रिय जलसंसाधन मंत्री यांना पत्राद्वारे व प्रत्यक्ष भेटीतून विनंती केली होती.

---

**कोल्हापूर येथे झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीबाबत**

**(११) ७११६ (०९-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथे दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जिल्ह्यातील दहा ते अठरा वयोगटातील शालेय व महाविद्यालयीन युवतींना मोफत सॅनिटरी नॅपकीन, सी.पी.आर रूग्णालयाच्या हृदयशस्त्रक्रिया विभागासाठी तीन व्हॅटिलेटर तसेच दुधाळी शुटिंग रेंजच्या विकासासाठी निधी देणे व शहरात ५४ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार केव्हापासून अंमलबजावणी होणार आहे व याकरिता किती निधीची तरतुद करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०५-२०१५) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) कोल्हापूर जिल्ह्याच्या जिल्हा वार्षिक योजना, सन २०१४-१५ अंतर्गत जिल्ह्यातील दहा ते अठरा वयोगटातील शालेय व महाविद्यालयीन युवतींना मोफत सॅनिटरी नॅपकीन पुरविण्याच्या नाविन्यपूर्ण योजनेस जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेनुसार प्रशासकिय मान्यता देण्यात आली असून रु.३५.०० लक्ष इतका निधी वितरीत केला आहे.

तसेच सी.पी.आर. रुग्णालयाच्या हृदय शस्त्रक्रिया विभागासाठी ३ व्हेंटीलेटर मशीन्स खरेदीसाठी रु.४९.५९ लक्ष खर्चाच्या नाविन्यपूर्ण योजनेस दि.३/३/२०१५ रोजी प्रशासकिय मान्यता देण्यात येऊन निधी वितरीत करण्यात आला. तथापि, वित्तिय वर्ष संपण्यास अल्प अवधी उरल्याने व्हेंटीलेटर खरेदी प्रक्रिया ३१ मार्च, २०१४ च्या आंत पूर्ण होऊ शकत नसल्याने अधिष्ठाता, सी.पी.आर. रुग्णालय यांनी सदरचा निधी प्रत्यार्पित केला.

दुधाळी शुटींग रेंजच्या विकासा संदर्भात १० मीटरच्या रेंजचे बांधकाम करणे यासाठी रु.५९.७३ लक्ष व सदर रेंजचे विद्युतीकरण व वातानुकुलीकरण व ध्वनीरोधण कामासाठी रु.४२.३४ लक्ष असे एकूण रु.१०२.०७ लक्ष खर्चाच्या नाविन्यपूर्ण योजनेस प्रशासकिय मान्यता देण्यात आली. मात्र, सन २०१४-१५ मध्ये संबंधित कामासाठी रु.२८.०० लक्ष इतका खर्च होणार असल्याने तेवढा निधी वितरीत करण्यात आला व उर्वरीत निधी प्रत्यार्पित करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याच्या रु.१००.०० लक्ष खर्चाच्या नाविन्यपूर्ण योजनेस जिल्हा नियोजन समितीने तत्वतः मान्यता दिल्याने त्या बाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती कार्यालयाने जिल्हा पोलिस अधिक्षक, कोल्हापूर यांचेकडून मागिवला होता. परंतु सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत मार्गदर्शक सूचनांचा सूचनांचा धोरणात्मक शासन निर्णय गृह विभागाकडून निघाला नसल्याने व जिल्हा पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांचेकडून योजनेचा प्रस्ताव प्राप्त न झाल्याने सदर नाविन्यपूर्ण योजनेस प्रशासकिय मान्यता देता आली नाही.

---

**राधानगरी येथे असलेल्या पहिला जलविद्युत प्रकल्प बंद करण्याचा घेतलेला निर्णय**

**(१२) ७२३२ (०४-०४-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील राधानगरी येथे असलेल्या पहिला जलविद्युत प्रकल्प बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा जलविद्युत केंद्र बंद करुन एक खाजगी जलविद्युत केंद्रास मान्यता देवुन सुरु करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रातील पहिले जलविद्युत केंद्राचे जतन न करता बंद करुन दुसऱ्या खाजगी जलविद्युत केंद्रास मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५)** :(१) होय, सदर निर्णय महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाचे सहमतीने घेतलेला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

महाजनको कडील राधानगरी येथील जलविदयुत प्रकल्पामधून वीज निर्मिती मागील ६३ वर्षापासून सुरु आहे.

सदर प्रकल्पाचे आयुर्मान संपले असून व याच पाण्यावर जास्त प्रमाणात विजनिर्मिती करण्यपाच्या उद्देशाने नवीन जलविदयुत प्रकल्प खाजगीकरणाच्या धोरणानुसार बांधण्यात आलेला आहे. लहान जलविदयुत प्रकल्प खाजगीकरणातून विकसित करण्याच्या दि.१५.९.२००५ च्या शासन धोरणानुसार निविदा कार्यवाही करुन नवीन राधानगरी जलविदयुत प्रकल्प (२x५ मे.वॅ.) खाजगी प्रवर्तकास विकसित करण्यासाठी देण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प २०११ मध्ये कार्यान्वित होऊन फेब्रुवारी २०१५ पर्यंत ९१.९४ दशलक्ष युनिट्स वीजनिर्मिती झालेली आहे. सदयस्थितीत दोन्ही जलविदयुत प्रकल्पातून वीजनिर्मिती चालू आहे.

(३) जलविदयुत प्रकल्पाचे आयुष्यमान सर्वसाधारणपणे ३५ वर्ष असते. राधानगरी धरणाच्या उजव्या तटावरील १९५२ साली कार्यान्वित केलेले ४.८ मे.वॅ. क्षमतेच्या विदयुतगृहास ६३ वर्षे झाल्याने सदर विद्युतगृह बंद करण्याचा निर्णय शासन स्तरावर राज्य विद्युत मंडळाचे सहमतीने घेतलेला आहे. तसेच उजव्या तीरावरील १० मे.वॅ. क्षमतेचा विद्युत प्रकल्प लहान जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणातून विकसित करण्याच्या दि.१५ .९.२००५ च्या शासन धोरणानुसार निविदा कार्यवाही करुन प्रवर्तकास शासन मान्यतेने दिलेला आहे. त्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्यावर कार्यवाही करणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्हा नियोजन समितीच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचा ८२०.४८ कोटीचा प्रारुप आराखड्यात कपात केल्याबाबत

**(१३) ७५४१ (०७-०४-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा नियोजन समितीवर सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचा ८२०.४८ कोटीचा प्रारुप आराखडा मंजूर करण्यात आला विविध कार्यान्वित यंत्रणांची १३५९.७८ कोटीची मागणी होती त्यापैकी ८२०.४८ कोटीचा निधीचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला असून ५३९ कोटी निधीची मागणीच्या तुलनेत कपात करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयात विविध स्तरावरील अनेक योजना प्रलंबित असून निधीच्या मागणीत तुलनेत कपात करण्यात आल्याने या योजना समाजाच्या विविध स्तरापर्यंत पोहचण्यास खंड पडणार असल्यामुळे उक्त मागणीनुसार निधीची तरतुद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०५-२०१५)** :(१) व (२) नाशिक जिल्ह्याच्या, सन २०१५-१६ च्या जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत (सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना, आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजना) शासनाकडून रु.८२०.४८ कोटीचा नियतव्यय तात्पुरत्या स्वरुपात कळविण्यात आला होता. विविध कार्यान्वयन यंत्रणांकडून रु.१३५९.७८ कोटीची मागणी करण्यात आली होती. तथापि, या अनुषंगाने राज्यस्तरीय बैठकीअंती रु.८७३.३३५५ कोटीचा अंतिम आराखडा निश्चित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील खाडी किनारीलगत असणा-या भातपिकाखालील जमिनी सुमद्राच्या भरतीच्या पाण्यामुळे बाधीत होत असल्याबबत**

**(१४) ७६२३ (०७-०४-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रागयड जिल्ह्यातील खाडी किनारीलगत १००० हेक्टर भातपिका खालील जमीन भरतीच्या मोठ्या उधाणामुळे बाधीत झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भातपिका खालील जमीनी पूर्ववत भातपिकाखाली आणण्याच्या दृष्टीने शासन मंजूर योजनांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०५-२०१५)** :(१) होय, हे अंशतः खरे आहे.

माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०१५ मध्ये झालेल्या मोठ्या उधानामुळे खारभूमी बांधाला खांडी गेल्या होत्या. स्थानिक लाभार्थ्यांच्या सहकार्याने तातडीने खांडी दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत.
(२) उपलब्ध अनुदानातुन नुतनीकरण व देखभाल दुरुस्तीची कामे करुन क्षेत्र नापीक होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.
(३) नाबार्ड अर्थसहाय्यांतर्गत २९ खारभूमी योजनांच्या नुतनीकरणाची कामे हाती घेणेत आली आहेत.

राष्ट्रीय चक्रीवादळ निवारण प्रकल्पाअंतर्गत रायगड जिल्ह्यातील ७ योजनांची कामे हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

---

**पेण (जि.रायगड) तालुक्यातील हजारो एकर भातशेती नापीक होऊन पडीक झाल्याबाबत**

**(१५) ७६७१ (०८-०४-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील जमीन अनेक ठिकाणी अगोदरच फुटलेल्या खारबंदीस्तीच्या बांधातून उधाणाचे खारे पाणी दिनांक २७ डिसेंबर, २०१४ रोजी शेतीत घुसल्याने दादर, भाल, कोप्रोली आदी ठिकाणची हजारो एकर भातशेती नापिक होऊन पडीक झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खारबंदीस्तीची कामे करोडो रुपये खर्च करुन देखील व्यवस्थित होत नसल्याने शेतकऱ्यांवर ही वेळ आल्याचे शेतकरी वर्गाकडून व्यक्त केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यावर कायमस्वरुपी पर्याय शोधून भातशेतीचे नुकसान होणार नाही याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :**(१) हे अंशतः खरे आहे.
माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०१५ मध्ये झालेल्या मोठ्या उधानामुळे नारवेल बेनवले खारभूमी योजनेतील भाल या गावाच्या भागाला पडलेल्या खाडींची दुरुस्ती उपलब्ध असलेल्या देखभाल व दुरुस्ती निधीतून व स्थानिक लाभार्थ्यांच्या सहकार्याने करुन लाभक्षेत्र नापिक होणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे.
तथापि, दादर, कोप्रोली या खाजगी योजना असल्यामुळे त्यांच्या दुरुस्तीची कामे शासनामार्फत केली जात नाहीत.
(२) नाही.
खारभूमी योजनेच्या देखभाल व दुरुस्ती करीता उपलब्ध निधीतून देखभाल व दुरुस्तीची कामे करुन क्षेत्र नापीक होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.
(३) नाबार्ड अर्थसहाय्यांतर्गत योजनांची नुतनीकरणाची कामे हाती घेऊन कमकुवत झालेल्या योजनांचे मजबुतीकरण तसेच उघाड्यांची नवीन बांधकामे करण्यात येत आहेत. तसेच, नारवेल बेनवले ही खारभूमी योजना राष्ट्रीय चक्रीवादळ आपत्ती निवारण प्रकल्पांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

---

## जालना जिल्ह्यातील मोतीबाग परिसरातील लघु पाटबंधारे विभागाच्या कनिष्ठस्तर कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी असलेल्या निवासस्थानाची झालेली दुरवस्था

**(१६) ७७९६ (०७-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील मोतीबाग परिसरातील लघु पाटबंधारे विभागाचे कनिष्ठस्तर कार्यालयासाठी असलेल्या अधिका-यांची व कर्मचा-यांची असलेली निवासस्थाने अत्यंत जुनाट झालेली असून पडझड झालेली आहे,
(२) तर काही घरे गळत असून प्लास्टर तसेच इतर बांधकामही धोकादायक झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवास्थाने दुरुस्तीविना प्रलंबित असण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त निवासस्थाने दुरुस्तीकरिता निधीची तरतुद करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, किती व सदर दुरुस्तीचे काम केव्हापर्यंत सुरु करण्यात येणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५)** :(१) ही निवासस्थाने सन १९८२ साली बांधण्यात आली आहेत. अधिकारी/कर्मचारी राहत असलेली निवासस्थाने जवळपास ३३ वर्षाची आहेत. यापैकी कोणत्याही निवासस्थानाची पडझड झालेली नाही.
(२) हे खरे नाही.

अधिकारी/कर्मचारी राहत असलेली कोणतेही निवासस्थाने गळत नाहीत. प्लास्टर व बांधकाम धोकादायक झालेले नाहीत व रहीवाशाकडून तसे निदर्शनास आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विदर्भ सिंचन महामंडळाकडे तब्बल दोन हजार कोटी रुपयांचा निधी पडून असल्याबाबत

**(१७) ७९८६ (०७-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ सिंचन महामंडळाकडे तब्बल दोन हजार कोटी रुपयांचा निधी पडून असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरु असताना उक्त निधी पडून राहण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१५)** :(१) अंशतः खरे आहे.
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे मार्च २०१५ अखेर रु.२५०६.७० कोटी निधी शिल्लक होता.
(२) भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन संपदान, सुधारित प्रशासकीय मान्यता व अभियंत्यांची रिक्त पदे इ. कारणामुळे निधीचा विनियोग होवू शकलेला नाही.
(३) शासन सातत्याने क्षेत्रिय वस्तुस्थितीची माहिती घेवून उपाययोजना करीत आहे.

(४) भूसंपादन, सुधारीत प्रशासकीय मान्यता, अभियंत्यांच्या रिक्त जागा भरणे इ. प्रक्रिया गतीमान करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**त्रिंबक-बागडेवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील जुना खार बंधारा फुटल्याने शेती नापिक झाल्याबाबत**

**(१८) ८००६ (०७-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील त्रिंबक-बागडेवाडी येथील जुना खार बंधारा फुटल्याने सुमारे १२५ हेक्टर शेती नापिक बनली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधारा फुटल्यामुळे आजुबाजूच्या जमिनीत खारे पाणी शिरुन सुमारे १२५ हेक्टर शेतजमीन नापिक होऊन शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, याठिकाणी कायमस्वरुपी खारबंधारा बांधून मिळावा अशी बागवेवाडी येथील ग्रामस्थाने स्थानिक लोकप्रतिनिधींकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त ठिकाणी कायमस्वरुपी बंधारा बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०५-२०१५) :**(१) नाही.
या ठिकाणी जलसंपदा विभागाची कोणतीही शासकीय खारभूमी योजना नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोंढाणे धरणाचे (ता.कर्जत, जि.रायगड) पाणी नवी मुंबईतील नियोजीत होणा-या प्राधिकरणाला मिळण्याबाबत**

**(१९) ८०२५ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढाणे धरणाचे (ता.कर्जत, जि.रायगड) पाणी नवी मुंबईतील नियोजीत होणाऱ्या प्राधिकरणाला मिळण्याबाबत सिडको प्रशासनाने राज्यशासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) अद्याप कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) सदर आरक्षण प्रस्ताव सिडकोकडून प्राप्त झाला असून छाननी चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जुन्नर तालुक्यातील (जि.पुणे) कुकडी प्रकल्प अंतर्गत पिंपळगाव जोगे धरणाची कामे पूर्ण करण्याकरीता निधी मिळण्याबाबत**

**(२०) ८०७० (०७-०४-२०१५). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर तालुक्यातील (जि.पुणे) कुकडी प्रकल्प अंतर्गत पिंपळगाव जोगे धरणाची उर्वरित कामे पुर्ण करण्याकरीता प्रलंबित देयकांसाठी ६०२.६१ लक्ष व चालु कामांसाठी ४८७ लक्ष असा एकुण १०८९.६१ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात यावा याकरीता मा.जलसंपदा मंत्री व मा.जलसंपदा राज्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने उपरोक्त निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :**(१) होय.

(२) कुकडी प्रकल्पाची द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमत रु ६९२.१८ कोटी असून प्रकल्पावर माहे मार्च २०१५ अखेर एकूण रु. २२६९.९८ कोटी इतका खर्च झालेला आहे. सदर प्रकल्पाचा तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव प्रचलित दरसुचीनुसार तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे. प्रकल्पास तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता मंजूर झाल्यानंतर निधी उपलब्ध करणे शक्य होईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीच्या सभेतील कार्यवृत्त जिल्हा परिषद पंचायत विभागाला न दिल्याबाबत**

**(२१) ८२११ (०७-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीच्या सभेत २०१२-१३ अंतर्गत अखर्चीत असलेला ३ कोटी ७५ लक्ष रुपयांच्या कामांना मुदतवाढ मिळून व सन २०१३-१४ मधील ६ कोटी ६२ लक्ष रुपयांच्या कामांना मंजुरी मिळून सहा महिने लोटल्यानंतरही सभेचे प्रोसिडींग जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाला संबंधीत अधिका-यांनी न दिल्यामुळे अद्यापही कामे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सभेचे प्रोसिडींग जि.प.पंचायत विभागाला न देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास सदरहू प्रलंबित कामे तातडीने होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

अकोला जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक २७/०६/२०१४ च्या बैठकीचे इतिवृत्तास मा.पालकमंत्री तथा अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती, अकोला यांची मान्यता प्राप्त होताच सदरचे इतिवृत्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना जिल्हाधिकारी, अकोला यांनी दिनांक २९/१२/२०१४ रोजी पाठविले आहे.

शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ०६/०६/२००८ मधील सुचनेनुसार, एखादया वर्षात मुक्त केलेला व पुढील एका वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी अखर्चित राहिलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनास परत करणे बंधनकारक असल्यामुळे सन २०१२-१३ अंतर्गत जनसुविधा योजनेचा अखर्चित निधी रु. ३७५.२६/- लक्ष शासनास समर्पीत करण्याबाबत शासन पत्र, दिनांक १६/०८/२०१४ अन्वये जिल्हाधिकारी, अकोला यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना तशी कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी कळविल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अकोला यांनी उपरोक्त नमुद रु. ३७५.२६ लक्ष निधी समर्पित केल्याचे आदेश दिनांक १८/०४/२०१५ रोजी काढले आहेत.

तसेच सन २०१३-१४ अंतर्गत जनसुविधा योजना व तिर्थक्षेत्र विकास योजनेचा रु. ६६२.०० लक्षच्या कामांना जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक २७/०६/२०१४ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुसार जिल्हा परिषदेने दिनांक ०२/०१/२०१५ रोजी कामांना प्रशासकीय मंजूरी देवून निधी वितरीत केला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इंदापूर तालुक्यातील उजनी जलाशयात मत्स्यबीज सोडण्याबाबत**

**(२२) ८२८८ (०४-०४-२०१५). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात असलेल्या उजनी जलाशयात गत अनेक दिवासापासून मत्स्यबीज न सोडल्याने मासे उत्पादन कमी होत असल्याने भोई समाजावर उपासामारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार भोई समाजाची उपासमार होऊ नये म्हणून उजनी जलाशयात मत्स्यबीज सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०५-२०१५)** :(१) अशी कुठलीही तक्रार क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. मासेमारी करणाऱ्या स्थानिक मच्छिमारांना अधिकृत पास देण्याची प्रक्रिया दिनांक १६.६.२०१२ पासून क्षेत्रीय स्तरावर चालू आहे. सध्या प्रती माणसी रु.५००/- प्रती माहे इतकी फी आकारुन मच्छिमारांना पास दिला जातो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्ह्यातील पोथरानाला व लालनालाचे कामकाज**
**चंद्रपूर पाटबंधारे विभागाकेड सोपविण्याबाबत**

**(२३) ८६६० (०७-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील पोथरानाला व लाल नालाचे कामकाज चंद्रपूर पाटबंधारे विभागाकडे सोपविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास मा.जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप या संदर्भात निर्णय घेतला नसल्यास विलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०५-२०१५)** :(१) होय.
(२) व (३) महामंडळ कार्यालयाने अंतर्गत कार्यालयांच्या पुनर्रचनेचा एकत्रित प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या अंतर्गत लालनाला व पोथरा नाला प्रकल्पांच्या व्यवस्थापन कामासाठी लघु पाटबंधारे विभाग, चंद्रपूर अंतर्गतचा बांधकाम कार्यप्रकारातील लभान सराड कालवे उप विभाग, बरोरा हा सिंचन व्यवस्थापन कामासाठी रुपांतरीत करुन लपोला पाटबंधारे उप विभाग या नावाने चंद्रपूर पाटबंधारे विभाग, चंद्रपूर अंतर्गत कार्यान्वित करण्याचा प्रस्ताव आहे. याबाबत शासन स्तरावर छाननी करण्यात येत असून अद्याप निर्णय झालेला नाही.

---

**पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणाच्या पाणी साठ्याबाबत**

**(२४) ९६७२ (०७-०४-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराला पाणी पुरवठा करणा-या धरणामध्ये माहे जुलै, २०१५ पर्यंत पुरेल असा पाणी साठा उपलब्ध आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागाने पुणे मनपास पाणी कपातीची सुचना माहे नोव्हेंबर, २०१४ मध्येच दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरातील माहे जुलै, २०१४ पर्यत अथवा तसम काळापर्यंत पाणी पुरवठा प्राधान्याने व अखंडीत होण्यासाठी जलसंपदा विभागाने काय नियोजन केले आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०६-२०१५) :**(१) खडकवासाला प्रणालीतून पुणे शहर व परिसर, दौंड व इंदापूर नगरपालिका व इंदापूर तालुक्यातील २२ ग्रामपंचायतींना पाणी पुरवठा केला जातो. दि. ९/१२/२०१४ रोजी गतवर्षीच्या याच दिवसापेक्षा १.७० टिएमसीने पाणीसाठा कमी उपलब्ध होता. यामुळे पुणे महानगरपालिकेसाठी पाण्याची कमतरता भासण्याची शक्यता आहे.

(२) होय.

(३) जुन-जूलै २०१५ मध्ये संभावित पाणी टंचाई सदृष्य परिस्थिती उध्दवू नये याकरिता महानगरपालिकेने पाणी वापरामध्ये बचतीच्या आवश्यक उपाययोजना हाती घेणेबाबत व सद्यस्थितीत होणारा पाणीवापर कमी करण्याबाबत निदेश दिलेले आहेत.

---

**राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये काम करणा-या सफाई कर्मचाऱ्यांना पुरेसे वेतन व स्वच्छतेसाठी आवश्यक सामुग्री मिळण्याबाबत**

**(२५) १०९६८ (०७-०४-२०१५). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये काम करणा-या सफाई कर्मचाऱ्यांना अत्यल्प वेतन देण्यात येत असून सफाईसाठी आवश्यक असलेले साहित्यही देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचा-यांना पुरेसे वेतन व स्वच्छतेसाठी आवश्यक असणारी सामुग्री पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०७-२०१५) :**(१) नाही.

राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना शासन अधिसूचना दिनांक ०७ ऑगस्ट, २०१३ नुसान किमान वेतन अदा करण्यात येते. तसेच ग्रामपंचायत स्तरावरुन सफाईसाठी आवश्यक असणारे साहित्याची देण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) सौंदळ बारेवाडी धरणातील गाळ काढण्याबाबत**

**(२६) १२४०८ (०८-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) सौंदळ बारेवाडी धरणातील पाणी रात्री सोडण्यात येत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मागील तीन वर्षात धरणातील पाणी साठा सोडून देखील गाळ उपसण्याचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सौंदळ चे पाणी सोडण्यात येत असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये प्रचंड नाराजी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(५) तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

बारेवाडी धरण क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात गाळ साचलेला आहे, गाळ उपसा करण्याचे तसेच सेवाव्दार दुरुस्तीचे काम मागील २ वर्षे चालू आहे, दि. २/६/२०१४ पर्यंत सेवाव्दार बाहेर काढून दुरुस्तीचे काम चालू होते. परंतू त्यादरम्यान पावसाला सुरुवात झाल्यामुळे सेवाव्दार मूळ जागी बसविण्यात आले. परंतू दुरुस्ती पुर्ण झाली नसल्यामुळे व विमोचक विहीरीत गाळ असल्यामुळे सेवाव्दार व उंबरठा पातळी यामध्ये पोकळी राहील्याने सेवाव्दारातून मोठया प्रमाणात गळती होत होती. त्यामूळे धरण दि. २०/१२/२०१४ पर्यंत आपोआप रिकामे झाले.

(२) अंशत: खरे आहे.

धरणाच्या बुडीत क्षेत्राच्या पूर्ण रुंदीमध्ये उंबरठा पातळीच्या वरती २ मी. उंचीचा गाळ साठलेला आहे. सन २०११-१२ व सन २०१३-१४, सन २०१४-१५ मध्ये गाळ उपसण्यासाठी धरणातील पाणी सोडण्यात आलेले आहे. तथापि धरण स्थळावरील भौगोलिक अडचणीमुळे गाळ उपसण्याचे काम पुर्ण झालेले नाही.

(३) हे खरे नाही.

जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी विभागाकडून गाळ उपसण्याचे काम करण्यात येत आहे. तथापि धरण स्थळावरील भौगोलिक अडचणीमुळे गाळ उपसण्याचे काम पुर्ण झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहर व पुणे जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाच्या जमिनीवरील अतिक्रमणाबाबत

**(२७) १३३६९ (०८-०४-२०१५). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर व पुणे जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच सदर अतिक्रमणे हटवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :**(१) अंशतःखरे आहे.

(२) पुणे शहर हददीतील अतिक्रमणे हटविण्यासाठी पुणे महानगरपालिका यांचे सहकार्य घेऊन अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या उर्ध्वगामी नलिकेसाठी संपादित केलेल्या जमीनीवर मौजे कोरेगांव मुळ, शिंदवणे व उरळीकांचन येथील काही शेतक-यांनी अतिक्रमण केले असून ते हटविण्यासाठी संबंधितांना नोटिसाव्दारे व जाहीर प्रकटनाव्दारे सूचना करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील गौण खनिजांच्या स्वामित्व धनावरील अनुदानाचे वाटप संबंधीत ग्रामपंचायतींना करण्यात आलेले नसल्याबाबत

**(२८) १६४०८ (०६-०८-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९८५ पासून राज्यातील गौण खनिजांच्या स्वामित्व धनावरील अनुदानाचे वाटप संबंधीत ग्रामपंचायतींना करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गौण खनिजाच्या स्वामित्व धनावरील अनुदान संबंधीत ग्रामपंचायतींना न दिल्यामुळे ग्रामपंचायतींच्या विकास कामांना अडथळा निर्माण झाला असल्यामुळे गौण खनिजांच्या स्वामित्व धनावरील अनुदान संबंधीत ग्रामपंचयातींना देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

प्रत्येक वर्षी या विभागाकडून गौण खनिजावरील स्वामित्व धनाच्या मिळकतीतून अभिहस्तांकित रकमांचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यात येतात. सदर मंजूर झालेल्या अनुदानाचे वाटप जिल्हाधिकारी कार्यालयांकडून तहसिलदार कार्यालयामार्फत संबंधित ग्रामपंचायतींना करण्यात येते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दोडामार्ग तालुक्यातील मणेरी-आंबोली रस्ता क्र.९२ हा पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून मंजूर रस्त्याच्या कामाला विलंब होत असल्याबाबत**

**(२९) २३७८८ (०७-०८-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग तालुक्यातील मणेरी-आंबोली रस्ता क्र.९२ हा पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून मंजूर झालेल्या व कामासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध असतानाही रस्त्याचे काम सुरू करण्यास विलंब केला जात असल्याने रस्त्याचे काम त्वरीत सुरु करण्याच्या मागणीसाठी मनेरी ग्रामस्थांनी कुडाळ येथील कार्यालयासमोर दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा रस्ता दुसऱ्या मार्गाने वळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-१०-२०१५) :**(१), (२) व (३) काही ग्रामस्थांनी ग्रामीण मार्ग ९२ हा दुसऱ्या मार्गाने वळविण्यासाठी उपोषण केले आहे.

(४) व (५) सन २०००-२०२१ या रस्ते विकास आराखडयातील नकाशात दाखविल्याप्रमाणे ग्रा.मा.९२ मणेरी-आंबोली या रस्त्याचे काम मंजुर असुन त्यानुसार रस्त्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे. त्यामुळे चौकशी केली नाही.

---

## शेतीची मशागत पेरणी व पीक काढण्यापर्यंतची सर्व कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत घेण्याबाबत

**(३०) २३८३८ (१४-०८-२०१५). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतीची मशागत पेरणी व पीक काढण्यापर्यंतची सर्व कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत घेण्यात यावीत अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ५ जुन, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या आत्महत्या टाळण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत शेतीची कामे घेण्यात याव्यात असेही या निवेदनात नमुद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-१०-२०१५) :**(१) सदर विषयाबाबत मा.आमदार डॉ.अनिल सुखदेवराव बोंडे यांचे दि. २६ मे, २०१५ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

(२) शेतक-यांच्या आत्महत्येचे मुख्य कारण शेती करीता लागणारा खर्च आहे असा दि.२६ मे, २०१५ च्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

(३) महात्मा गांधी राग्रारोहयोंतर्गत स्थायी स्वरुपाची मालमत्ता तयार करणे, हे योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. महात्मा गांधी राग्रारोहयो कायदा २००५ तसेच मार्गदर्शक सुचनांनुसार, शेतीची मशागत, पेरणी व पीक काढण्यापर्यंची सर्व कामे ही वारंवार उद्‌भवणारी असल्याने ती योजनेंतर्गत अनुज्ञेय नाही.

तथापि, योजनेंतर्गत अनुज्ञेय कामांमध्ये शेतीला पूरक जसंधारणाची कामे, जलसिंचन कालव्याची कामे, भूविकासाची कामे, कृषि विषय कामे उदा.नाडेप कंपोस्टिंग, गांडूळ खत तयार करणे (Vermi composting), जैविक खते (लिक्विड बायोमॅन्युअर्स) इत्यादी अनुज्ञेय आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिल्हा परिषद हिंगोली मध्ये अधिकारी गट अ २४ व कर्मचारी गट ब ४२ पदे एकूण ६६ पदे ब-याच कालावधी पासून रिक्त असल्याबाबत

**(३१) २३८८४ (१७-०८-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद हिंगोली मध्ये अधिकारी गट अ २४ व कर्मचारी गट ब ४२ पदे एकूण ६६ पदे ब-याच कालावधी पासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेतील अपूऱ्या कर्मचाऱ्यांमुळे नागरिकांच्या दैनंदिन कामांस विलंब होत असल्याने नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्तपदे सत्वर भरण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १९ जानेवारी, २०१५ चे पत्रान्वये शासनास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रिक्तपदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०६-१०-२०१५)** :(१) जिल्हा परिषद, हिंगोली मध्ये महाराष्ट्र विकास सेवा गट-अ संवर्गात ९ पदे मंजूर असून ६ पदे भरलेली आहेत व ३ पदे रिक्त आहेत. तसेच महाराष्ट्र विकास सेवा गट-ब संवर्गातील ८ पदे मंजूर असून सर्व पदे भरलेली आहे.

महाराष्ट्र विकास सेवा व्यतिरिक्त अन्य संवर्गातील गट-अ आणि गट-ब मध्ये १६५ पदे मंजूर असून त्यापैकी १०१ पदे भरलेली आहेत व ६४ पदे रिक्त आहेत.
(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र विकास सेवा गट-अ मधील रिक्त पदे तदर्थ पदोन्नतीने/बदलीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच अन्य संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत संबंधित विभागांना कळविण्यात आले आहे.

---

## जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सोलापूर जिल्हयातील पात्र विहिरींच्या पुर्नभरण कामांना मंजूरी देण्याबाबत

**(३२) २३९५१ (१७-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सोलापूर जिल्हयात विहिर पुर्नभरणाची ७ हजार ७१९ कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून पुर्ण झाली असून लोकसहभागातून ८२७ कामे पूर्ण तर ८४८ कामे सुरु असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयातील पात्र विहिरींच्या पुर्नभरण कामाची अंदाजपत्रके तयार करुन त्यांना तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत तसेच या योजनेत अधिकाधिक लोकसहभाग वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-१०-२०१५)** :(१) जलयुक्त शिवार अभियान योजनेंतर्गत सोलापूर जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून १५४९ विहिर पुनर्भरणाची कामे पुर्ण झाली असून १३१ कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच लोकसहभागातून १३,८३२ कामे पुर्ण झाली असून २३८८ कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) शासनाने या कार्यक्रमांतर्गत विहिर पुनर्भरणाची कामे घेण्याबाबत सविस्तर आदेश दिनांक २७ मे, २०१५ च्या शासन परित्रकान्वये निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार राज्यात विहिर पुनर्भरणाची कामे तातडीने घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु

आहे. तसेच या योजनेत लोकसहभाग वाढविण्याबाबत शिवार फे-या, ग्रामसभा तसेच ग्रामसेवक व सरपंच यांच्या बैठका क्षेत्रिय स्तरावर घेण्यात येत आहे. तसेच मोबाईल व्हॅनव्दारे जनजागृती करण्यात आलेली आहे व याबाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा नियोजन मंडळातील निम्म्या सदस्यांना नियोजन मंडळाकडून निधी मिळत नसल्याबाबत**

**(३३) २४३५४ (१७-०८-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा नियोजन मंडळाकडून जिल्हा परिषदेला मिळणा-या निधीतून मंडळाच्या सदस्यांच्या मतदार संघातील कामांसाठी निधी देण्यात येत असल्याने सुमारे निम्म्या सदस्यांना नियोजन मंडळाकडून निधी मिळणार नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सदस्यांनी पुर्वीप्रमाणे निधी मिळण्याची मागणी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान करुनही अद्यापही शासनाने कोणताच निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने निर्णय घेतला असल्यास त्यांचे स्वरुप काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१०-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) जिल्हा नियोजन समिती ही घटनात्मक समिती असल्याने शासनाने मंजूर केलेल्या नियतव्ययानुसार जिल्ह्यात मंजूर योजनेखाली कामे घेण्याबाबतचा निर्णय सदर समितीद्वारे घेण्यात येतो.

---

**नाशिक जिल्हा परिषदेच्या सायकल पुरविणे या योजनेअंतर्गत रेट कॉन्ट्रॅक्स पध्दतीने नियुक्त केलेल्या संबंधित कत्रांटदारांनी सायकल पुरवठा न केल्याबाबत**

**(३४) २४६१८ (३०-०७-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या वतीने सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल पुरविणे या योजनेअंतर्गत रेट कॉन्ट्रॅक्स पध्दतीने नियुक्त केलेल्या संबंधित कत्रांटदारांना पुरवठयाचा ठेका देऊन देखील त्यांनी पुरवठा केलेला नाही ही बाब माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, संबंधित कंपन्यांविरोधात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-१०-२०१५) :**(१) होय.
(२) संबंधित पुरवठादार कंपनीवर पुरवठा संदर्भात बंदी घालणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील खटाव तालुकयातील मौजे भांडेवाडी येथील गट क्र.४०९ मध्ये रस्त्यावर अतिक्रमण केल्याबाबत**

**(३५) २४७७३ (१७-०८-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील खटाव तालुकयातील मौजे भांडेवाडी येथील गट नं.४२९ मध्ये जाण्यायेण्यासाठी गट क्र.४०९ मधून रस्ता आहे, हा गट ग्रामपंचायत भांडेवाडी यांचे नावावर आहे, हे खरे आहे काय,
(२) गट क्र.४०९ मध्ये रस्त्यावर अतिक्रमण झाले असून या रस्त्यावर अनधिकृत घराचे बांधकाम सुरु असून बारगज घालण्याचे काम सुरु करण्यात आले असल्यामुळे हा रस्ता बंद अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) गट क्र.४०९ हा ग्रामपंचायत भांडेवाडी यांचे नावावर असल्यामुळे या रस्त्यामध्ये झालेले अतिक्रमण काढण्यासाठी तहसिलदार खटाव (वडुज) यांनी गटविकास अधिकारी वर्ग १ पंचायत समिती खटावा यांना दिनांक १८ सप्टेंबर, २०१४ रोजी पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गटविकास अधिकारी वर्ग १ पंचायत समिती खटाव यांनी सदरचे अतिक्रमण काढलेले आहे का, नसल्यास त्याची कारणे काय आहेत,
(५) या रस्त्यावरील अतिक्रमण त्वरीत काढण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-१०-२०१५) :**(१) होय.
(२) गट क्र.४०९ हा ग्रामपंचायत भंडेवाडी यांचे मालकीचा असून सदर गटामध्ये घराचे काम पूर्वीचे झाले असून त्यामुळे सदरचा रस्ता पुर्णपणे बंद झालेला नसून अतिक्रमण केल्याने रस्त्याची रुंदी कमी झाली असून त्यामुळे मोठ्या वाहनांची वाहतूक होत नाही.
(३) होय.
(४) व (५) तहसिलदार खटाव यांचेकडील दि.१८/९/२०१४ च्या पत्रास अनुसरुन गट क्र.४०९ मधील अतिक्रमण काढणेबाबत सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत भांडेवारी यांना गटविकास अधिकारी, पंचायत समिती. खटाव यांनी त्यांचेकडील दि.२०/१०/२०१४ रोजीच्या पत्रान्वये पुढील योग्य ती कारवाई करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार ग्रामपंचायत भांडेवाडी यांनी

गट क्र.४०९ मधून जाणा-या रस्त्यावरती झालेल्या अतिक्रमणाची व गटाच्या हद्दी कायम करुन घेणेसाठी उप अधिक्षक भूमि अभिलेख, वडूज यांचेकडे दि.२७/५/२०१५ रोजी मोजणीसाठी शुल्क रु.७०००/- भरणा करण्यात आला असून अद्याप सदर गटाची मोजणी संबंधित विभागाकडून झालेली नसल्याने गटाच्या हद्दी कायम करण्यात आलेल्या नाहीत. गट क्र.४०९ मधील रस्त्यावरती अतिक्रमण केलेल्या संबंधित अतिक्रमणधारक यांना अतिक्रमण काढण्याबाबतच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. सदर गट क्र.४०९ ची मोजणी झाल्यानंतर मोजणी नकाशात दर्शिवलेले अतिक्रमण तात्काळ काढणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

---

**मु.किर्लोस (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३६) २४८४८ (१४-०८-२०१५). श्री.रविंद्र चव्हाण (डोंबिवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु. किर्लोस (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील ३ मीटर रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे,

(३) असल्यास, रस्त्यांच्या नुतनीकरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) होय, खरे आहे.

(२) होय.

(३) प्रश्नाधिन रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास आराखड्यानुसार शिरंवडे गोठवणे असा असून त्याचा दर्जा ग्रामीण मार्ग क्र. ११७ आहे. सदर रस्त्याची अस्तित्वातील लांबी ४.४२५ कि.मी. आहे. सदर लांबीपैकी १.६९० कि.मी. लांबीतील रस्त्याचे डांबरीकरणाद्वारे नुतनीकरण करण्यात आले आहे. उर्वरित खराब पृष्ठभागाचे डांबराद्वारे नुतनीकरणाचे काम सन २०१५-१६ रस्ते व पुल दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या नव्याने पदभरती व रिक्त पदभरती रोखल्याबाबत**

**(३७) २५०८१ (१४-०८-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सत्तेवर येताच आर्थिक स्थितीबाबत श्वेतपत्रिका काढण्याची घोषणा मा.वित्त मंत्री यांनी केल्यानुसार विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आर्थिक स्थितीवर श्वेतपत्रिका काढण्यात आल्यानंतर राज्याची खालावलेली आर्थिक स्थिती सावरण्यासाठी निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात यापुढे शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे भरण्याबाबत तसेच रिक्त पदाच्या भरतीवरही बंदी घालण्याचा निर्णय शासनाने दिनांक ३ जुन, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील घोषणेनुसार नवीन पदांना म्हणजेच नोकर भरतीस काही काळासाठी बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनातील खर्च नियंत्रित करण्याचे दृष्टीने केवळ १० संवर्गातील रिक्त पदांपैकी ७५ टक्के व अन्य संवर्गातील केवळ ५० टक्के भरण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोणत्या कोणत्या संवर्गातील पदभरती किती दिवसांसाठी बंद केली आहे,

(६) असल्यास, सरकारी कर्मचा-यांच्या वेतनावर ७३ हजार कोटी, निवृत्ती वेतनावर २० हजार कोटी तर व्याजावर २७ हजार कोटी असा १ लाख २१ हजार कोटींचा वार्षिक खर्चाचा प्रश्न उभा करून रिक्त जागा न भरल्याने शासनाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी व शासनाचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०९-२०१५) :**(१) होय.

(२), (३), (४) व (५) दिर्घकालीन वित्तीय स्थैर्यासाठी वेतनवाढीचा सरासरी दर हा महसूल वाढीच्या सरासरी पदापेक्षा अधिक असता कामा नये, हे सर्वमान्य तत्व पाळणे आवश्यक असल्याने दि.२ जून, २०१५ च्या आदेशान्वये नवीन पदनिर्मिती पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. मात्र हे बंधन सिडको, MMRDA, PMRDA, NIT, NMRCL, MMRCL, PMRCL यासारख्या आर्थिक सक्षम स्वायत्त संस्थांना तसेच केंद्र शासन पुरस्कृत (ज्या आस्थापनांचे पगार केंद्र शासनाच्या अनुदानातून होतात.) संस्थांना लागू राहणार नाहीत.

शिक्षक, पोलीस कॉन्स्टेबल, ग्रामसेवक, तलाठी, आरोग्य परिचारीका, पशुधन परिवेक्षक, मत्स्यव्यवसाय विभागाचे तालुका स्तरावरील अधिकारी, वन रक्षक, कृषी सहायक, पाटबंधारे विभागाचे कनिष्ठ अभियंता या संवर्गात मोडणाऱ्या पदांना एकूण रिक्त पदांपैकी ७५% पर्यंत पदे भरण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तर या संवर्गाव्यतिरिक्त इतर संवर्गातील सरळ सेवेच्या कोट्यातील रिक्त असणाऱ्या पदांपैकी ५०% किंवा एकूण संवर्गाच्या ४% यापैकी जे कमी असेल इतकीच पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(६) शासकीय विभाग/कार्यलयातील गट अ ते गट ड मधील ज्या संवर्गातील रिक्त पदांचा अनुशेष मोठ्या प्रमाणावर असून विहित टक्केवारीपेक्षा जास्त प्रमाणात पदे भरण्याचे तातडीची

गरज आहे, अशा बाबतीच रिक्त पदे भरण्यास मान्यतेचे प्रस्ताव प्रशासकीय विभागास पूर्ण समर्थनासह अपर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखालील स्थापित केलेल्या समितीस सादर करता येईल, असा निर्णय सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १६ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

(७) यासंदर्भात खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

अ) दिनांक ०२/०६/२०१५ च्या शासन निर्णयान्वये वेतनावरील खर्चाची वाढ मर्यादित करण्यासाठी उपाययोजना निश्चित केली आहे.

ब) उद्योग क्षेत्रासाठी वीजवरील अनुदान कमी केली आहे.

क) सर्व व्यक्तीगत लाभार्थी योजना न्यायानिवाड्याच्या आधीन आधारशी जोडून लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँकेतील खात्यात परस्पर जमा करण्याबद्दल प्रयत्न सुरु आहेत.

ड) नगर विकास विभाग, महसूल विभाग, गृहनिर्माण विभाग यांनी अतिरिक्त महसूल वाढीचे उद्दीष्ट देण्यात आले आहे.

इ) राज्याच्या वित्तीय स्थितीबाबत श्वेतपत्रिका प्रकाशित करण्यात आली आहे. त्यातील कार्यवाहीसाठी मांडळलेल्या मुद्यांवर राज्याच्या खर्चाच्या नियंत्रणासाठी, आर्थिक सामाजिक विकासासाठी संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.

ई) सार्वजनिक प्रापण व्यवस्था पारदर्शक किफायतशीर व कार्यक्षम होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

प) देशी अल्कोहोलिक मद्यावरील उत्पादन शुल्क व पुनर्गणना करण्यात येत असून याद्वारे अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अर्नाळा, कसा व रानगाव (ता.वसई जि.पालघर) या गावातील**
**इंदिरा आवास योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(३८) २५१३७ (१७-०८-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील (जि.पालघर) काही वर्षापूर्वी ग्रामिण दारिद्रय रेषेखालील कुंटुबांचा निवारा प्रश्न सोडविण्यासाठी इंदिरा आवास योजनेअंतर्गत अर्नाळा, कसा व रानगाव या गावात उपरोक्त योजनेअंतर्गत प्रत्यक्ष पात्र लाभार्थ्यांना घरकुल न मिळता अपात्र व धनदांडग्याचा समावेश दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या यादीत करून यामध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, सर्व संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) नाही.

सन २००२-२००७ च्या दारिद्र्य रेषेखालील सर्वेनुसार अर्नाळा व रानगाव ग्रामपंचायतीमध्ये तयार करण्यात आलेली इंदिरा आवास योजनेची प्रतिक्षा यादी, लाभ दिलेले लाभार्थी शिल्लक लाभार्थी, अपात्र लाभार्थी यांची संख्या खालीलप्रमाणे :-

| ग्राम पंचायतीचे नाव | २००२-०७ BPL लाभार्थी संख्या | प्रतिक्षा यादीत समाविष्ट लाभार्थी संख्या | २००६-०७ ते २०१४-१५ पर्यंत लाभ दिलेले लाभार्थी संख्या | शिल्लक लाभार्थी | जागा नसणे, पक्के घर, स्थलांतर या कारणामुळे अपात्र लाभार्थी | सन २०१५-१६ मध्ये लाभ देण्यास पात्र लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|
| अर्नाळा | ७३४ | ५८१ | १४६ | ४३५ | ४२९ | ६ |
| रानगांव | २२७ | २०९ | १०९ | १०० | ७४ | २६ |

कसा ग्रामपंचायत वसई तालुकयात समाविष्ट नसल्यामुळे त्या ग्रामपंचायतीची माहिती देण्यात आलेली नाही. अर्नाळा व रानगांव ग्रामपंचायतीमधील लाभार्थ्यांना इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार लाभ देण्यात आला आहे. त्यामुळे अपात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देणे व दारिद्र्य रेषेखालील यादीत धन-दांडग्या लाभार्थ्यांचा समावेश करुन आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याबाबतची बाब अर्नाळा व रानगांव ग्रामपचायती मध्ये व पंचायत समिती कार्यालय, वसई येथे निदर्शनास आलेली नाही. सद्यस्थिती पात्र असलेल्या ३२ लाभार्थ्यांना सन २०१५-१६ मध्ये घरकुलांचा लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील केळवा रोड आणि सफाळे रेल्वेस्थानकाला जोडणाऱ्या कपासे-केळवा रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३९) २५१४२ (१७-०८-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील केळवा रोड आणि सफाळे रेल्वेस्थानकाला जोडणाऱ्या महत्वाच्या कपासे-केळवा रस्त्यावरील डांबरी खडी वाहून गेल्याने मोठमोठे खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) कपासे-केळवा रोड हा रस्ता ४ कि.मी. चा असून हा रस्ता यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने बनविला होता, सध्या हा रस्ता जिल्हापरिषदेच्या अखात्यारित येत असून व त्या रस्तावर अनेक मोठे खड्डे पडल्याने वाहन चालक, स्थानिक रहिवासी व शाळकरी विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त रस्त्याचे योग्य प्रकारे दुरुस्तीचे काम करुन रस्ता पुर्ववत वाहतूकीकरीता करुन देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) या रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष केल्याबद्दल संबंधिताविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१०-२०१५) :**(१) व (२) अंशत: खरे आहे. प्रश्नांकित रस्त्यांमधील खराब लांबीतील खड्डे भरण्याचे काम प्रगतीत असून वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

(३) केळवा रेल्वे स्टेशन ते सफाळा रेल्वे पुल रस्त्यांच्या ०.६५५ कि.मी. लांबीची दुरुस्ती सन २०१४-१५ ते २०१५-१६ मध्ये करण्यात आली असून सदरचा भाग सुस्थितीत आहे. तसेच ०.९०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर आहे. उर्वरीत रस्त्यांच्या खराब लांबीतील दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेमार्फत करण्याचे नियोजन आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वैजापूर तालुक्यातील लोणी खुर्द या गावात ग्रामपंचायतीने केलेला गैरव्यवहार**

**(४०) २५१६० (१४-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर तालुक्यातील सहा हजार लोकसंख्या असलेल्या लोणी खुर्द या गावात २००८ मध्ये भारत निर्माण योजनेंतर्गत १ कोटी २७ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला होता मात्र ग्रामपंचायतीने कागदोपत्री योजना पूर्ण झाल्याचे दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) नाही.

(२) वैजापूर तालुक्यातील लोणी खुर्द गावासाठी भारत निर्माण योजनेच्या कामांतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी १ कोटी २७ लाख रुपयांचा निधी प्राप्त झालेला नसून सदर योजनेची प्रशासकीय मान्यता रु.७४.८६ लाख इतक्या रकमेची आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष कामासाठी रु.७२.८१ लाख एवढी रक्कम खर्च झाली. त्यामुळे मंजूर निधीपेक्षा जास्त निधी खर्च झालेला नसून मंजूर योजनेप्रमाणे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर योजनेतून डिसेंबर, २०१० पासून लोणी खुर्द गावासाठी पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आर्णी मतदार संघातील घाटंजी तालुक्यातील आदिवासी भागात २५१५ या शिर्षकाखाली निधी मिळण्याबाबत**

**(४१) २५२४८ (१७-०८-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी मतदार संघातील घाटंजी तालुक्यातील आदिवासी भागात २५१५ या शिर्षकाखाली निधी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी मा.अर्थ व नियोजन मंत्र्यांना दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी निवदेन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०६-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.विकास २०१५/प्र.क्र.५०/यो-६ दि.३०.३.२०१५ अन्वये गावांतर्गत १७ कामांसाठी रुपये एक कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

---

**तालुकानिहाय मानव विकास मिशन अंतर्गत मोताळा (जि.बुलडाणा) तालुक्याचा समावेश करण्याबाबत**

**(४२) २५३१६ (१७-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने तालुकानिहाय मानव विकास निर्देशांक निश्चित करण्याचा प्रकल्प यशदा पुणे मार्फत हाती घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही शासनाकडे तालुका विकास मानव निर्देशांक उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्यस्थितीत मानव विकास मिशन अंतर्गत समाविष्ट तालुके लक्षात घेता निर्देशांक कमी असलेल्या अनेक तालुक्यांचा त्यामध्ये समावेश नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विकासाच्या मोठया प्रमाणावर अनुशेष असलेल्या मोताळा तालुका मानव विकास मिशन अंतर्गत समाविष्ट करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०९-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

तालुका मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (NSS) च्या पध्दतीप्रमाणे महाराष्ट्रातील सर्व ३५७ तालुक्यामध्ये सर्वेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे तांत्रिक सहकार्य घेण्यात येत आहे. सदरचे

सर्वेक्षण NSS पध्दतीप्रमाणे १ जुलै, २०१४ ते ३० जून, २०१५ या कालावधीत करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सर्वेक्षणातून संकलित केलेल्या माहितीच्या आधारे Data Entry आणि Data Analysis चे काम सुरु आहे. तद्नंतर तालुकानिहाय मानव निर्देशांक परिगणित करण्यात येऊ शकेल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) मानव विकास निर्देशांक परिगणित करणे, ही विशिष्ट कालावधीत चालणारी शास्त्रीय स्वरुपाची संशोधन प्रक्रिया असल्याने विलंब झालेला नाही. त्याचा तपशील मुद्दा क्र. २ मध्ये विषद केला आहे.

---

**बुलडाणा जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे दोन विभाग करण्याबाबत**

**(४३) २५३४८ (१७-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हा परिषदे अंतर्गत बांधकाम विभागाकडे २५०० कि.मी. लांबीचे रस्ते आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी जिल्ह्यासाठी एकच विभाग आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे २ विभाग करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१०-२०१५) :**(१) सन २००१-२१ रस्ते विकास योजनेनुसार बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत ५५१०.३९ कि.मी. लांबीचे रस्ते आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) शासन निर्णय क्र. रागांपं. २०१४/प्र.क्र.१४२/योजना ४ दिनांक १ ऑगस्ट, २०१४ द्वारे राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानांतर्गत ग्राम पंचायत स्तरावर पंचायत अभियंता (प्रति ग्रामपंचायत) व गट अभियंता (प्रति पंचायत समिती) ही पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने निर्माण करण्यात आलेली पदे विचारात घेऊन तसेच जिल्हा परिषदांकरिता उपलब्ध विभाग/उपविभाग, तांत्रिक मनुष्यबळ व कार्यभार विचारात घेऊन आवश्यक विभाग व उपविभाग निर्माण करण्याच्या जिल्हा परिषदांच्या प्रस्तावाच्या आढावा घेऊन सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात आले आहे.

सर्व जिल्हा परिषदेकडून सुधारित प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नवीन विभाग/उपविभाग व आवश्यक कर्मचारीवृंद निर्माण करण्याचा प्रस्ताव उच्चस्तरीय समिती समोर ठेवण्यात येईल.

---

**आजरा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) रामतीर्थ पर्यटन स्थळाकडे जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४४) २५५४३ (१७-०८-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) रामतीर्थ पर्यटन स्थळाकडे जाणा-या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर पर्यटन स्थळाकडे जाणा-या रस्त्याची दुरस्ती करण्याची मागणी मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे चंदगडचे लोकप्रतिनिधीनी यांनी दि.१५ जून,२०१५ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर पर्यटक स्थळाकडे जाणा-या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) जिल्हा परिषदेमार्फत प्रश्नाधिन रस्त्याची पहाणी करण्यात आली आहे.

(४) व (५) रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार प्रश्नाधिन रस्त्याचे नाव रामा १८८ पासून रामतिर्थ रस्ता ग्रामा ११२ असे असून त्याची एकूण लांबी १.०० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकष यांच्या अधिन राहून करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**राज्यातील ग्रामपंचायत व तालुक्यास्तरावर आपत्कालीन स्तरावर आग विझवण्याच्या यंत्रणा कार्यरत करण्याबाबत**

**(४५) २५६१३ (१७-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायती व तालुक्यास्तरावर आपत्कालीन स्तरावर आग लागल्यास आग विझवण्याची कोणतीही यंत्रणा कार्यरत नसल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुकास्तरावर आग विझविण्यासाठी पंचायत समित्यांकडे अग्निशमन दलाची उभारणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०९-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राज्याच्या अग्निशमन सेवा सक्षमीकरणासाठी व बळकटीकरणासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान ही योजना राबविण्यात येत आहे. राज्यात राज्यस्तरीय अग्निशमन सेवा नसल्यामुळे ही सेवा नागरी स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणे यांच्यामार्फत पुरविण्यात येते. सद्यस्थितीत राज्यातील १३८ तालुका मूख्यालयाच्या ठिकाणी नगरपालिका/नगरपंचायती स्थापन करण्याची कार्यवाही सुरु असून याबाबत कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर राज्याच्या अग्निशमन सेवा सक्षमीकरणासाठी व बळकटीकरणासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान ही योजना या तालुक्यांना लागु करण्याचा विचार करण्यात येत आहे.

---

## राज्यामध्ये जन्म आणि मृत्यू याची नोंद घेण्याबाबत

**(४६) २५७८७ (१७-०८-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यामध्ये जन्म आणि मृत्यू याची नोंद ग्रापंचायतीमध्ये करण्यात येते एखाद्या व्यक्तीने एका वर्षानंतरही ग्रामपंचायतीमध्ये नोंद नसल्यास तहसिलदार यांचेकडे अधिकार आहेत परंतु आता एका वर्षापेक्षा अधिक कालावधीमध्ये जन्म-मृत्यू याची नोंद नसल्यास जन्म-मृत्यूचा दाखला मिळविण्याकरिता थेट प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी किंवा महानगर दंडाधिकारी यांचे आदेश ग्राह्य धरण्यात येणार आहेत असे दिनांक १७ डिसेंबर, २०१३ रोजी निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे व सदर आदेश शासन बदलणार आहे किंवा नाही,
(४) असल्यास, सदर आदेशात शासनाने आदिवासी व गोरगरीब जनतेचा विचार केलेला आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) क्रिमिनल पी.आय.एल. क्र.४/२०१३ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दि.१७.१२.२०१३ रोजी दिलेलया निकालास अनुसरुन विधी व न्याय विभागाच्या दि.३१ डिसेंबर, २०१३ च्या परिपत्रका अन्वये ज्या जन्म-मृत्यू घटनांची नोंदणी घटना घडल्यापासून एक वर्षाच्या आत झाली नसेल, अशा घटनांच्या नोदणीसाठी फक्त प्रथमवर्ग न्यायिक दंडाधिकारी किंवा महानगर दंडाधिकारी यांचेच आदेश ग्राह्य धरण्यात यावेत असे कळविण्यिात आले आहे. त्यानुसार राज्यात सर्वत्र कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील मजुरांना कामे देण्याबाबत

**(४७) २५८३१ (१७-०९-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील ग्रामसेवकांनी केलेल्या संपामुळे त्याचा परिणाम मजुरांवर झाला आहे. कामाच्या मागणी पत्रकावर ग्रामसेवकांच्या सहया नसल्यामुळे विहिरींची कामे बंद आहेत, त्यामुळे मजुरांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील मजुरांना कामे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-१०-२०१५) :**(१), (२) व (३) अध्यक्ष/सचिव महाराष्ट्र मागसेवक युनियन यांच्या निवेदनानुसार ग्रामसेवकांनी दिनांक ५.५.२०१५ पासून मग्रारोहयाचे काम बंद आंदोलन सुरु केल्याने शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०१२/प्र.क्र.८३/रो-१० अ दिनांक ३०.४.२०१२ नूसार सरपंच व ग्रामरोजागार सेवक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने मजुरांच्या मागणीप्रमाणे कामे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

---

## नांदेड येथील हिमायतनगर तालुक्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेत होत असलेला गैरव्यवहार

**(४८) २५९२९ (१७-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील हिमायतनगर तालुक्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतील सिंचनासाठी असलेल्या विहिरी या अल्पभूधारकांऐवजी धनाढ्य व श्रीमंत शेतक-यांना देण्यात येत असल्याने येथील ग्रमपंचायतीची व अधिका-यांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी अल्पभूधारक शेतक-यांने केली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-१०-२०१५) :**(१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही किंवा यासंदर्भात तक्रारही प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रावेर (जि.जळगांव) तालुक्यातील या रस्त्यांचे पंतप्रधान ग्रामीण सडक योजने अंतर्गत सुरु असलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(४९) २६०७८ (१७-०८-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर जि.जळगांव तालुक्यातील १) रसलपुर-आभोडा-जिन्सी २) पातोंडी-थेरोडा-पुनखेडा ३) रसलपूर-केरहाळा या रस्त्यांचे पंतप्रधान ग्रामीण सडक योजने अंतर्गत सुरु असलेले काम संथ गतीने, अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-१०-२०१५) :**(१), (२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

प्रश्नांकित ३ रस्त्यांपैकी रसलपूर-अभोडा-जिन्सी व रसलपूर-केरहाळा या रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी तपासणीनंतर समाधानकारक शेरा दिला आहे. उर्वरित पातोंडी-थेरोडो पुनखेडा रस्त्यांचे काम खडीकरणापर्यंत पूर्ण झाले असून राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी त्यास समाधानकारक शेरा दिला आहे. तसेच हे काम कंत्राटदाराने निधीअभावी बंद केले आहे. राज्य शासन स्तरावरुन केंद्र सरकारकडे निधीसाठे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**पैठण तालुक्यातील (जि.औरंगाबाद) रोजगार हमी योजने (जुने) अंतर्गत पाझर तलावाच्या कामाची उर्वरित देयके मिळण्याबाबत**

**(५०) २६०९२ (१७-०८-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण तालुक्यातील (जि.औरंगाबाद) रोजगार हमी योजने (जुने) अंतर्गत पाझर तलावाचे काम २००७-०८ मध्ये पुर्ण केलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाचे आरंभीचे देयके दिलेले आहेत व उर्वरित देयके मिळण्यासाठी संबंधित अधिका-यांकडे वेळोवेळी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाचे अदयापही देयके मिळालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) सदर अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई विचाराधीन आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.